# अशिही एक लव स्टॉरी

कथालेखन आणि त्यात प्रेमकथेसारख्या अत्यंत अवघड विषयाशी निगडित लेखन करण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न...! असो... बऱ्याच विषयांशी संबंधित लेखन तर मी नेहमी करतो, पण त्याला पुर्णत्वास नेणं म्हणजे जीवावर येण्यासारखं काम... बघूयात, ह्या कथेचा शेवट तरी व्यवस्थित होतो का ते... शिवाय बऱ्याच... नाही, फारच दिवसांनंतर ब्लॉगवर काही लिखान करण्याचा आज योग आलाय, हीदेखील चांगली गोष्ट म्हणावी लागेल, नाहीतरी माझ्या कित्येक ब्लॉगर-मित्रांनी विशल्याच्या "सुरूवात"चा शेवट झाला की काय, अशी शोकांतिका (वा अफवा म्हणा!) गेल्या काही दिवसांपासून पसरवण्यास सुरूवात देखील केलेली होती... त्यांच्यासाठी मी जीवंत असल्याची ही पोच-पावती! (राग नका येवू देऊ हो!)   ;)

[डिस्क्लेमर: ही एकूणच कथा, यातील पात्रे, पात्रांची नावे, ठिकाणे, प्रसंग इत्यादी सर्व गोष्टी काल्पनिक आहेत. जर तुम्हाला कुठेही तुमच्या आयुष्यातील घटनांशी मिळते-जुळते प्रसंग आढळले, तर तो निव्वळ योगा-योग समजावा.]

----

"तुझ्या डोळ्यांत मला आभाळ दिसतं... तू असतेस तेव्हा मला कसं अगदी तुझ्या प्रितीच्या गार तुषार-सरींखाली मनसोक्त भिजल्यासारखं वाटतं... पण तू जेव्हा नसतेस ना जवळ, तेव्हा मात्र मी अगतिक होतो, कासावीस होतो... मला तुझ्याशिवाय क्षणभरही राहावत नाही प्रिये... हंऽऽ खरंच राहावत नाही गं..." राहूल अत्यंत भावविभोर होऊन स्वप्नरंजित शब्दांत काव्यमय पद्धतीने त्याच्या मनातले भाव अनिताच्या कानी ऐकवत होता.

वेळ संध्येची... रस्त्याच्या बाजूला असलेल्या कट्ट्यावर ती दोघं बसलेली होती. रस्त्याचे जरी डांबरीकरण झाले असले तरी तो शहराबाहेर अंदाजे १५ किमी दूर असलेल्या एका खाजगी शाळेला मुख्य रस्त्याशी जोडणारा जोडरस्ता होता. शाळेला हल्ली सुट्ट्या असल्याने राहूल अन् अनिताला मनमुराद अशी ती जागा होती... क्वचितच कोणी फिरकत होतं तिकडे, त्यामुळे बरेच दिवसांनंतर भेटीसाठी आसुसलेल्या या जोडप्याला आज एकमेकांस कडकडून भेटण्याची इच्छा न झाली तरच नवल... पावसाळ्याचे दिवस असल्याने आभाळ भरगच्च अशा काळ्याकुट्ट ढगांनी सर्वत्र भरलेले

होते. गेल्या अर्ध्या तासापासून अगोदर वाहणारा मंद वारा आता जरा आणखी सुसाट्याने वाहत होता. ह्या वर्षीचा तो पहिलाच पाऊस होता. अगोदरच २ महिने उलटून गेलेले तरीही पावसाची नुसती चाहूल देखील नव्हती, पण आज मात्र ढगांचा गलबलाट अन् वीजांचा एकसंध कडकडाट ऐकून तहानलेली धरणी निश्चितच सुखावली असेल...

----

याच दिवशी, म्हणजे १७ ऑगस्टला ती दोघे एक-मेकांना एका पुस्तक प्रदर्शनात भेटली होती. खरे पाहता, ते दोघे एकाच वर्गात शिकणारी, म्हणजे अभियांत्रिकीच्या माहिती तंत्रज्ञान शाखेत द्वितीय वर्षात शिकणारी मुलं... पण आजवर त्यांना एकमेकांशी काही खास कारणास्तव बोलण्याचासुद्धा योग आलेला नव्हता. भेटी तर नेहमीच होतात, पण ही भेट त्यांच्या आयुष्यातल्या सर्वात अनमोल व सुखद क्षणांची घटना ठरली होती. राहूल आधीपासूनच पुस्तकांची चाळाचाळ करण्यात मग्न होता. काही वेळातच अनिता तेथे येऊन धडकली व तीही पुस्तकं बघू लागली. तो तीला नावाने ओळखून होता, पण तिच्याशी काहीतरी सबब पुढे करुन बोलण्याचे धैर्य त्याच्याकडून होत नव्हते. अनिता दिसायला तशी सालस, करुण, सुंदर, गोऱ्या वर्णाची व काळेभोर लां केस असलेली देखणी युवती होती. राहूलने तीला ज्यावेळी प्रथम पाहिले होते ना, त्यावेळीच तो तीच्यावर फिदा झाला होता. त्याला नेहमी वाटे की, तीच्याशी काहीतरी बोलावं, पण गेल्या वर्षभर तरी त्याने तसा प्रयत्न देखील करुन बघितला नव्हता. उलट त्याला ती दुसऱ्याच कोणासोबत गुंतलेली असेल, असे वाटे... एरवी, त्याची उपस्थिती अनिताला समजली होती, तरीही तीने पुस्तकं चाळण्याचं तीचं काम चालू ठेवलं... तीलादेखील तो वर्गात आहे म्हणून माहिती होती, पण त्यावर अधिक जाणून घेण्याचा तीनेदेखील कधी प्रयत्न केला नाही व तसं करण्याची गरज देखील तीला यापूर्वी कधी वाटली नव्हती. दोघेही विरुद्ध दिशेकडून होते, व हळूहळू एकमेकांकडे येत होते, बहुदा त्यांना त्या गोष्टीची जाणीव नसावी. कवितेचे एक पुस्तक दोघांनीही नकळत एकाच वेळी उचलले अन् जे व्हायचे नव्हते ते झाले... राहूलकडून पुस्तकाची समोरची बाजू व पहिली काही पाने तर अनिताकडून अर्ध्यापासून मधली पाने हाती लागली, हे नकळत झाल्याने दोघांकडूनही ते पुस्तक त्यांनी आपापल्या दिशेने ओढले... एखाद्यावेळी जर पुस्तकाची बांधणी जर व्यवस्थित असती तर त्याचे तुकडे झाले नसते, पण निकृष्ट दर्जाची बांधणी अन् कमी दर्जाचा कागद असल्यामुळे त्या पुस्तकाचे दोन तुकडे झाले व काही पाने अस्ताव्यस्त फाटली गेली. ताड्कन तेथील समोरच्या टेबलापाशी बसलेला एक कारकूनवजा अधिकारी आणि पुस्तके वाचण्यात दंग झालेले इतर काहीजण त्यांच्यापाशी एकमेकांशी नाहक कसलीतरी गलबला

करीत आले. एव्हाना राहूलने ते पुस्तक जरा व्यवस्थित करुन जिथून उचलले होते त्या जागी ठेवण्याच्या तो तयारीत होता, पण त्या कारकूनवजा अधिकाऱ्याने त्याच्याकडून ते हिसकावून घेतले. त्यावेळी राहूलच्या चेहऱ्यावरील भाव तसे पाहणाऱ्याला चकित करुन टाकणारे होते, कारण तो इतरांकडे पाहतच अशा पद्धतीने होता की जसे काहीच झालेलं नाही... पण निःशब्द प्रदर्शन कक्षात पुस्तकाच्या फाटण्याचा आवाज थेट कक्षाच्या दरवाज्यापर्यंत ऐकू गेलेला होता. अनिता मात्र एवढी घाबरलेली होती की तीला आता फक्त रडूच कोसळायचं शिल्लक राहिलेलं होतं...

"तुम्ही कॉलेजकुमार कारटी म्हणजे..." काहीशा आचरट भाषेत तो अधिकारी राहूल अन् अनिताकडे त्याचा करडा रागीट चेहरा दाखवून त्यांना खडसावत होता.

"असू द्या हो... उलट आजकालची मुलं-मुली अशा प्रदर्शनांकडं फिरकत देखील नाहीत, ही गोंडस मुलं इकडं आली हीच मोठी गोष्ट आहे आपल्या संस्कृतीसाठी..." एक वृद्ध आजोबा त्या अधिकाऱ्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होते.

"नाही, ते काही नाही... हे पुस्तक यांच्याकडून फाटलंय त्यामुळे त्यांना त्या पुस्तकावरील किंमतीएवढी रक्कम जमा करावी लागेल..." वृद्ध आजोबांचे वाक्य मध्येच तोडीत तो अधिकारी उत्तरला.

"किती द्यायचे मग?" राहूलने खिशात हात घालीत त्या अधिकाऱ्याला तावातावात विचारले. त्याला राग येणे साहजिकच होते, कारण काही क्षणांपूर्वी तो अधिकारी त्याला व अनिताला काही-बाही बोलला होता त्यामुळे निश्चितच त्याचा राग अनावर झाला असला तरी संयम बाळगून त्याने चेहऱ्यावरील हाव-भाव स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला.

"एकशे वीस रुपये!" त्या फाटलेल्या पुस्तकावरील किंमत बघण्यासाठी पाने चाळीत तो अधिकारी राहूलकडे डोळे वटारीत बोलला.

अनिताने लगेच बाहेर ठेवलेल्या तीच्या पर्सकडे धाव घेतली. राहूलने पैसे काढून द्यायच्या आत स्वतः द्यावयाच्या उद्देशाने ती प्रदर्शन-कक्षाच्या बाहेर पळतच गेली. लोकांनी पुस्तकं चोरून सोबत घेऊन जावू नयेत म्हणून प्रदर्शन कक्षाच्या बाहेरच लोकांनी आपापल्या पिशव्या, बॅग्ज इत्यादी ठेवाव्यात, असा नियम होता. आजही ॲडमिशन न झाल्यामुळे ती घरी जाण्याच्या तयारीत होती, पण वाटेतच तीला हे प्रदर्शन दिसले. अगोदरच्या दिवशीही ती तेथे येऊन गेलेली होती. त्यामुळे आधीच्या दिवशी न पाहिलेली पुस्तकं आज पाहायची, आणि पुस्तक-वाचनाची तशी

फार आवड असल्यामुळे तीने घरी न जाता प्रदर्शनातच थोडा वेळ घालवण्याचा विचार करुन ती इथे आली होती, अन् वरील प्रसंग तीच्यासोबत अनासयाने घडला होता. ती पर्स लगबगीने धुंडाळीत होती, पण काही केल्या तीला तीची पर्स सापडत नव्हती. तीने सर्व पाहिले पण तीला काही केल्या पर्स मिळेना, शेवटी वैतागून तीने त्या अधिकाऱ्यालाच हाक मारली, व विचारले,

"अहो काका, मी इथे येतेवेळी पर्स ठेवली होती, ती मिळत नाहियॆ... प्लीज, बघा ना एकवेळ..."

आतापर्यंत राहूलने मोजून एकशे वीस रुपये त्या अधिकाऱ्याच्या हवाली केले होते व ते फाटलेले पुस्तक स्वतःजवळ घेतले होते... अनिताची हाक ऐकताच अधिकारी अन् तो अनितापाशी धावले... सगळीकडे शोधाशोध करुन झाल्यावर अनिताचा चेहरा एकदम व्याकूळ झाला व ती रडक्या अन् दबक्या आवाजात राहूलच्या कानात पुटपुटली,

"अरे राहूल... कॉलेजहून इकडे येण्याअगोदर, माझी मैत्रीण सुमेधासोबत मी, श्री कॅफेटेरीयामध्ये कॉफी प्यायले होते, आणि बहुतेक तिथेच मी माझी पर्स विसरलीय... आणि खरं सांगायचं झालं तर पर्समध्ये तीस हजार रुपये आहेत..." ती कितीही दबक्या आवाजात बोलली असली तरी, तीचा आवाज राहूल व्यतिरिक्त नजिकच्या बऱ्याच जणांपर्यंत पोहोचला होता... पण तीस हजारांचा आकडा ऐकताच सर्वांनी मौन पाळणेच योग्य समजले असावे.

"काऽऽयऽऽ? तीऽऽस हजार रुपये?" राहूलची तर बत्तीशीच बसायची बाकी होती...

"चल पटकन..." प्रदर्शन-कक्षाच्या बाहेर ठेवलेली आपली कॉलेज-बॅग गळ्यात अडकावित त्याने त्याच्या बाइकची किक मारीत अनिताला मागे बसण्यासाठी खूण केली. अनिताचा कंठ दाटून आला होता, साहजिकच डोळ्यांत पाणी आल्यामुळे तीला सर्वकाही अस्पष्ट व अंधुक दिसत होते... कशीबशी ती राहूलच्या पाठीमागे स्वतःला थोडंफार सावरुन बसली. आता काहीही बोलण्याची तर तीच्यात शक्तीच उरली नव्हती...

राहूल जमेल तेवढ्या भरधाव वेगाने श्री कॅफेटेरीयाकडे बाइक हाकत होता. त्यांचा कॉलेजला लागूनच ते कॉफीसाठीचे शहरातील एक नावाजलेले रेस्टॉरंट होते. तथापि, तेथील मालकाशी राहूलचे संबंध तसे चांगले होते. काही मिनिटांतच ती दोघे कॅफेटेरीयासमोर येऊन दाखल झाली. राहूलने लगेच गाडी हाफ स्टँडवर पार्क करुन कॅफेटेरीयात धाव घेतली... अनितासुद्धा त्याच्या पाठोपाठ पळतच गेली. जिथे ती व तीची मैत्रीण सुमेधा बसल्या होत्या, तिथे ती गेली... पण

तिथं काही तीला पर्स आढळली नाही. तीने लगेच सुमेधाला फोन करुन विचारण्याचा प्रयत्न केला की, तीने तर पर्स सोबत नेली नाहिये ना... पण त्याचा काही उपयोग झाला नाही. सुमेधाकडून नकारार्थी उत्तर मिळताच राहूल काउंटरपाशी गेला व त्याने कॅफेटेरीयाच्या मालकाकडे त्याबद्दल विचारणा केली. झाला प्रकार कॅफेटेरीयाचा मालक पाहतच होता, अन् त्याने अनिताला ओळखले देखील होते. राहूलशी त्याचे संबंध जरा चांगले असल्याने त्याने राहूलचे बोलणे व्यवस्थित काळजीपूर्वक ऐकले. अनिता राहूलच्या मागेच उभी होती... तीने देखील बोलण्याचा प्रयत्न केला, पण तीच्या तोंडून शब्दच फुटत नव्हते... कॅफेटेरीयाच्या मालकाने लगेच अनिताची पर्स राहूलच्या हाती दिली, अनिताने पर्स राहूलच्या हातात असतानाच पर्सची चैन उघडून त्यामधून एका प्लास्टिकच्या पिशवीत दूमडून ठेवलेले बंडल काढले अन् ते राहूलच्या हाती देत पर्स स्वतःकडे घेतली. राहूलने त्या प्लास्टिकच्या पिशवीतून नोटांचे बंडल काढून अधाश्यासारखं मोजण्यास सुरूवात केली.

"हुश्शऽऽ... बरोब्बर आहेत... हे घे..." हसऱ्या चेहऱ्याने अनिताकडे पाहत तीला त्या नोटा देत राहूल उत्तरला. गेल्या अर्ध्या तासाभरापासून गंभीर भाव असलेल्या त्याच्या चेहऱ्यावर एकदम काही कोटींचा खजिना हाती लागावा, त्यावेळी जसा अत्यानंद होत असेल, तसे भाव त्याच्या चेहऱ्यावर झळकले.

"यापूर्वीही अशा वस्तू विसरण्याच्या अनेक घटना आमच्या कॅफेटेरीयामध्ये घडल्या आहेत... पण मी आणि येथील सर्व कर्मचारी आमच्या कामाशी प्रामाणिक आहोत. माझ्याजागी जर दुसरा कोणी असता, तर त्याने निश्चितच तुमची बॅग दिली नसती... आणि खरं सांगायचं म्हणजे, मला किंवा इथल्या कोणालाही याबद्दल मुळीच माहिती नव्हती की तुमच्या या बॅगमध्ये एवढे पैसे आहेत म्हणून... असो... तुम्हाला आतापर्यंत फार त्रास झाला असणार, झाल्या प्रकाराबद्दल..." कॅफेटेरीयाचा मालक अत्यंत सौम्य व विनम्र भाषेत बोलत होता. तिथे बसलेल्या अनेक विद्यार्थ्यांना आणि इतर गिऱ्हाईकांना झाला प्रकार समजण्यास फार वेळ लागला नाही. कॅफेटेरीयाच्या मालकाचे वरील उद्गार ऐकताच सर्वांनी टाळ्यांचा कडकडाटाचा त्याच्यावर वर्षाव केला,

राहूल व अनितानेही कॅफेटेरीयाच्या मालकाचे व इतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले व ते तिथून बाहेर पडले. तीला आतातर रडू आवरणे अवघड झाले होते. तीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू बाहेर पडत होते. यावेळी राहूलने बाइकवर बसण्यासाठी तीला कसलीही खूण केली नव्हती वा तो तसं बोललाही नव्हता, पण कोण जाणे, ती त्याच्या त्याच्या पाठीमागे बाइकवर विराजमान झाली...

राहूलने बाइक शहराच्या बाहेर जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दिशेने वळवली. राहूलच्या मनात गेल्या तासाभराचे चित्र खेळू लागले. पुस्तक प्रदर्शनात अनिताचं येणं, त्यानंतर पुस्तक फाटण्याचा विस्मयकारी प्रसंग, नंतर पैसे देण्यासाठी आपल्या पर्सकडे धावलेली अनिता, मध्यंतरी तेथील अधिकाऱ्याशी झालेली वादावादी, अनिताची पर्स हरवल्याची बातमी कळणं, तीचा त्यावेळचा रडका चेहरा, नंतर तीचं त्याच्या पाठीमागे बाइकवर बसणं, कॅफेटेरीयातील ताज्या घडामोडी.... सर्वकाही आठवून राहूल स्वतःशीच स्मीत करीत मिश्किलपणे जोरजोरात खिदळत होता. अनिताचं रडणं आता जरा कमी झालं होतं, साहजिकच होतं म्हणा ते... राहूलही जाणून होता, त्याने शहराच्या बाहेर असलेल्या एका शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याकडे त्याची बाइक वळवली. अनिताचे रस्त्यावरील रहदारीकडे फारसे म्हणण्यापेक्षा मुळीच लक्ष नव्हते. तीने राहूलच्या पाठीवर तीचा उजवा गाल, कान दबेल अशा स्थितीत स्वतःला झोकून दिलं होतं... कॅफेटेरीयापासून शहराच्या बाहेर येईपर्यंत तीने याच स्थितीत राहूलच्या पाठीवर उसासे सोडले होते. पहिले-पहिले तर राहूलही झाला प्रकार पहिल्यापासून आठवण्यात गर्क होता, त्यामुळे त्याला तीच्या उसासे टाकण्याच्या गोष्टीबद्दल जराही संवेदना जाणवल्या नाहीत... पण नंतर शाळेकडे गाडी वळवतांना त्याला त्याची पाठ ओली झाल्याचं जाणवलं व ती कशाने झाली असणार हे देखील कळालं... तो हसतच अनिताला म्हणाला,

"अगं आधीच एवढी थंडी वाजतीय, अन् त्यात तू रडून-रडून माझी पाठ ओली केलीहेस बघ... शिवाय तुझ्या मोत्यांसारख्या टपोऱ्या अश्रुंनी माझ्या शर्टावर किती सुंदर नक्षी बनली असेल नाही... माझ्या आईला फार आवडेल बघ... उद्या त्याच ठिकाणी पाठीवर धपाटे खाऊन यावे लागेल मला, आईच्या हातचे..."

हे राहूलचं बोलणं ऐकून, न राहावून अनितादेखील हसायला लागली अन् हसतच त्याच्या पाठीवर झोकून दिलेले आपले मुंडके हटवून हलकेच बुक्क्यांचा मारा करीत ती म्हणाली,

"चल चावट कुठला... एखाद्या रडक्याला हसवण्याचं काम तुला फार छान जमतं रे..."

"हम्म, तेवढंच जमतं मला फक्त..." राहूलने अनिताच्या म्हणण्याला दुजोरा दिला व दोघेही हसायला लागले.

संध्याकाळचे चार वाजून गेले होते, अन् शिराळ असल्याने उन्हाचा त्रास नव्हताच... शिवाय तेथील त्या शाळेला काही कारणास्तव त्या दिवशी सुटी होती... राहूलच्या तर मनासारखं झालं होतं आणि होत होतं आज सगळं... रस्त्याच्या बाजूला असलेल्या कट्ट्याजवळ राहूलने बाइक पार्क

केली. दोघेही त्या कट्ट्यांवर जाऊन बसली अन् एकमेकांकडे चेहऱ्यावर स्मीत आणून एकटक पाहू लागली... आता हे देखील साहजिकच आहे, सुमारे १० मिनिटं ती दोघं नुसतं हसत होती, एकमेकांकडे पाहून... झालं, साडेचार वाजण्याच्या सुमारास राहूल एकदम उठून उभा राहिला व तीच्यासमोर दोन्ही पायांच्या गुडघ्यांवर वाकून तीला म्हणाला,

"ए अनिता... तू खूप सुंदर आहेस अगदी रतीप्रमाणे, असं वाटतं की तुझ्याकडे नुसतं पाहतंच राहावं... मला तू खूप खूप आवडतेस... मी तुझ्यावर आजवर जरी प्रेम करीत नसलो, तरी आतापासून यानंतर मात्र अखेरपर्यंत जीवापाड प्रेम करीन. तुझ्यासाठी वाट्टेल ते करीन, प्रसंगी प्राणही देईन. तू माझी होशील का गं?"

तो होकाराची वा त्याच्या म्हणण्याला दुजोरा तरी मिळेल या भावनेने, तन्मयतेने अनिताकडे एकटक पाहत होता.

क्षणभर त्याच्याकडे शांत मुद्रा ठेऊन अनितासुद्धा पाहत राहिली व नंतर तीही त्याला म्हणाली,

"अरे हो रे... मी तुझीच आहे व राहीन... त्यात विचारण्यासारखं काय एवढं... मी तर माझं सर्वस्वच तुला अर्पण केलंय... तुझा माझ्यावर संपूर्ण अधिकार आहे आता... पण फक्त माझी एक विनंती आहे ती तू मान्य केलीस तर फार छान होईल..."

"बोल गं प्रिये... तुझं काहीही ऐकायला मी तयार आहे..."

"आपण आज पहिल्यांदाच असं भेटतो आहोत... माझ्यामते व बहुदा तुलाही असं वाटत असेल, की आपण एकमेकांना जाणून घेणं फार फार गरजेचं आहे. वाटतंय ना?"

"हम्म, बरोबर बोलतीहेस तू... पटतंय मला तुझं... मग काय करायचं ठरवलंहेस तू?"

"आपलं एकमेकांवरील प्रेम कधीच कमी होणार नाही, तशी त्याची सर्व काळजी आपण दोघंही आपापल्या परीने घेत जावू... आतापासून ते आपली डिग्री मिळेपर्यंत म्हणजे तब्बल तीन वर्षे आपल्या एकमेकाच्या सानिध्यात राहून जाणून घेता येईल... चालेल?"

"चालेल..."

"नंतरचा विचार आपण याच तारखेला, याच ठिकाणी, तीन वर्षांनंतर बसून करूयात, ठिक?"

"हो गं बाई... मंजूर... जशी राणीसाहेबांची आज्ञा..."

संध्याकाळचे ५ वाजून गेले तरी अजुनही त्यांचं दिवसभरातील झालेल्या एकन्-एक प्रसंगांवर हसणं काही आवरत नव्हतं...

----

आज त्याच कट्ट्यावर, त्याच तारखेला म्हणजे, १७ ऑगस्टला, तीन वर्षांनंतर ती दोघं भेटून भावी आयुष्याबद्दल विचार करण्यासाठी पुन्हा एकत्र आली होती..

गेल्या काही वेळापासून सुसाट्याने वाहत असलेल्या वाऱ्याच्यासोबत व ढगांच्या गडगडाटांसोबत अखेर मोसमातील पहिला-वहिला पाऊस सुरु झाला. रस्त्याच्या बाजुलाच असलेल्या त्या कट्ट्यावर, जेथे राहूल अन् अनिता बसलेले होते, तेथे पावसापासून बचावासाठी काही आच्छादनाची सुविधा नव्हतीच, त्यामुळे त्यांना तेथून एखाद्या सुरक्षित जागी जाणे भाग होते. आधीच आक्राळ-विक्राळ थैंबांच्या सरींसह पाऊस सुरु झाला होता, अन् त्यात वीजांचा कडकडाटसुद्धा चालूच होता. राहूलचे बोलणे मध्येच तोडत अनिताने स्वतः उभं राहू त्याचा हात धरुन त्याला ओढण्याचा प्रयत्न केला. राहूल आपल्या धूंदीत होता, त्याला पहिल्या क्षणी तर कळालेच नाही की अनिता अशी काय करती आहे ते... पण नंतर जेव्हा ओल्या-चिंब भिजलेल्या अनिताकडे त्याने पाहिले तेव्हा कुठे त्याला जाणवले की पाऊस सुरु झाला आहे... :) पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यानंतर अनिता खचली नाही, ती त्याला उठविण्याचे प्रयत्न करीतच होती. एव्हाना राहूलच्या ध्यानात आलं होतं की अनिता नेमकी काय करण्याचा प्रयत्न करते आहे ते... तसा तो स्वतःदेखील उठला असता, पण त्याने तसे केले नाही. अनिताने त्याचा हात आपल्या दोन्ही नाजूक तळहातांनी घट्ट धरून शक्य तेवढ्या ताकदीनिशी पुन्हा एकदा आपल्या दिशेने ओढण्याचा प्रयत्न केला. यावेळी मात्र राहूल तीने ओढल्याबरोबर उठून उभा राहिला अन् लगेच तीलादेखील आपल्याकडे ओढले... शेवटी तो शरीरयष्टीने तसा धष्टपुष्ट होताच, आणि अनितासारखी नाजूक मुलगी म्हणजे त्याच्या एका हाताचाच खेळ...! असं आकस्मिक ओढलं गेल्याने ती थेट त्याच्या कुशीत जाऊन विराजली. तिचे कपाळ त्याच्या छातीवर आदळले गेले, हं पण दोघांनाही त्याच्या वेदना मात्र जाणवल्या नाहीत. कसलाही प्रतिकार न करता तीने त्याच्या छातीवर तीच्या गालांचा हळूवार दाब देऊन दोन्ही हातांनी त्याला घट्ट मिठी मारली... ती काही बोलणार, एवढ्यातच राहूलने तीच्या बोलण्याला न जुमानता त्याचं बोलणं चालू केलं,

"काय गं... भिती वाटतीय का पावसाची... घाबरली तर नाहीस ना तू?" तो तीच्या डोक्यांवरील भिजलेल्या केसांवर तीला त्रास होणार नाही अशा पद्धतीने त्याची दाढ हनुवटी ठेऊन पुटपुटत होता.

"नाही रे... भिती कसली, पावसाऽची... छेऽऽ रे... आणि आता तर तुझ्या कुशीत असताना कशाची म्हणजे कश्शाऽऽचीच भिती नाही वाटत मला..." अनिताने अजुन त्याला दोन्ही हातांनी घट्ट आवळण्याचा प्रयत्न केला.

"रिअलि?" तो तिच्या चेहऱ्यावरुन ओघळणाऱ्या थेंबांना पुसत अन् तिच्या केसांची बट सावरत म्हणाला.

"अरे हो रे बाबा... पण आज पावसात तुफान वारा वाहतो आहे, त्यामुळे खूप थंडी वाजतीय आता..." तीने त्याच्या छातीत आपला संपूर्ण चेहरा लपविण्याचा प्रयत्न चालू ठेवला.

"ओह्ह माय बॅडलक, आधीच सांगायचं ना... तसं माझ्या कुशीत तुला खूप ऊब मिळत असेलच नाही...?" आता त्याने देखील तीला दोन्ही हातांनी मिठी मारुन स्वतःकडे आणखी ओढून घेतली.

" हो रे राजा... मी तर मरेपर्यंत तुझ्या कुशीत अशीच निपचित राहण्यास तयार आहे, पण मला तुझी जास्त काळजी वाटते आहे..."

"अच्छा... म्हणजे राणीसाहेबांना आमची जास्त काळजी आहे तर..."

"चल आता येथून... पाऊस थांबल्यावर परत येऊ इथे..."

"जो हुकूम, राणीसाहेबा..."

हात बाजुला सावरत तो अनिता बाजुला होण्याची वाट पाहू लागला. अनितानेदेखील त्याच्याभोवती आवळलेले हात काढून घेतले व तीसुद्धा त्याच्यापासून बाजूला झाली.
राहूलने तेथेच बाजूला उभी केलेली बाइक काढली व अनेक प्रयत्नांति शेवटी चालू  केली... अनिता तोवर स्तब्ध उभी होती, व बाइक चालू झाल्यानंतर राहूलच्या पाठीमागे जाऊन बसली. ती

व्यवस्थित बसली आहे की नाही, याचा अंदाज घेऊन त्याने बाइक शाळेच्या दिशेने हाकली. तिथून शाळा फक्त २ किमी अंतरावर होती. सुटी असल्याने शाळेच्या गेटला देखील कुलूप होते व चोहोबाजूंनी उंच भिंतींचे कुंपण असल्याने मध्ये जाण्यासाठी इतर कुठलिही वाट नव्हती. शाळा मोठी असल्याकारणाने तेथे गेटच्या बाहेरच सेक्युरिटी गार्डसाठी एक एक छोटीशी खोली करण्यात आली होती. तिथे दरवाजा मात्र नव्हता, ही गोष्ट राहूल व अनिताला आधीपासूनच ठाऊक होती, म्हणूनच ते तिथे आले होते. पावसाच्या सरी ज्या दिशेने कोसळत होत्या, त्या दिशेला खोलीमधून त्या सरी भिंतीमुळे आतमध्ये येऊ शकत नव्हत्या, त्यामुळे ती खोली अजुनही कोरडीच होती. आणि चांगली गोष्ट म्हणजे तिथे बसण्यासाठी आधीपासूनच बाकासारखे वीटा-सिमेंट इत्यादींद्वारे बांधकाम केलेले होते. राहूलने बाइक लगेच बाहेर उभी केली व ती दोघे त्या खोलीत गेले. राहूल खोलीत गेल्या-गेल्या तेथील बाकावर जाऊन बसला. अनिताने खाली बसण्याअगोदर आपले विस्कटलेले केस व्यवस्थित करु लागली, यावेळी तीच्या केसांमधील पाण्याचे थेंब त्याच्या चेहऱ्यावर तुषाराप्रमाणे उडत होते... तो तिच्याकडे एखाद्या नलाप्रमाणे पाहत होता, ती आता दिसतच तशी होती, एखाद्या रतीप्रमाणे... अगोदरच ती अतिशय सुंदर होती, तीचे तारुण्य तीच्या प्रत्येक अवयवात, अंगात झळकत होते... आणि आता तर ती पुर्णपणे भिजून ओली-चिंब झालेली होती. आज तीने पर्पल रंगाचा अतिशय सुंदर टॉप अन् निळ्या रंगाची जीन्स परिधान केली होती, हा ड्रेस तिच्या मागच्या वाढदिवसाच्या वेळी राहूलनेच तीला भेट म्हणून दिला होता. कोणतीही सुंदर तरुणी तीच्याकडे बघणाऱ्याला कामोवृत्त करतच असते... अनिताही तशीच, आणि आता तर संपुर्णतः भिजलेली... जरी राहूल तीच्याकडे कामुक नजरेने पाहत असला तरी तो संयम बाळगून होता. त्याच्याजागी एखादा दुसरा असता, तर आतापर्यंत त्या दुसऱ्याने सीमोल्लांघन करून अग्नि पेटवला असता... हे तर नैसर्गिकच म्हणता येईल. मग राहूल का संयम ठेवून होता, आणि एवढा संयम बाळगणं कसं शक्य होतं बरं... आणि महत्वाचं म्हणजे अनितालादेखील ही गोष्ट ठाऊक असणारच की तो सध्याच्या घडीला काय करु शकत होता ते, पण तरीही ती त्या गोष्टीकडे काहीच लक्ष देत नव्हती... त्याच्यामध्ये अथवा तीच्यामध्ये काही प्रॉब्लेम असण्याचा प्रश्नच नव्हता... या सर्व गोष्टींमागचे अप्रत्यक्ष कारण पुर्वी झालेल्या एका घटनेमध्ये दिसून येतं...

घटना आहे, ती दोघे तीसऱ्या सेमीस्टरला असतांनाची, म्हणजे सेमीस्टरची परिक्षा झाल्यानंतरची... अभियांत्रिकी मध्ये प्रत्येक वर्षात २ सेमीस्टर्स असतात, म्हणजे ४ वर्षांत एकूण ८ सेमीस्टर्स... राहूल आणि अनिता यांची भेट द्वितिय वर्षाच्या सुरूवातीला, म्हणजेच तीसऱ्या सेमीस्टरच्या वेळी झाली होती. त्यानंतर त्यांच्यामधली सलगी वाढतच गेली. राहूलचे तीन जवळचे वर्गमित्र अन् अनिताच्या चार वर्गमैत्रिणी असे एकूण ९ जणांचे फ्रेंड सर्कल काही दिवसांतच तयार झाले. राहूल, हर्षद, अंकित, अजय, अनिता, राजश्री, सुमेधा, निशा, कावेरी असे हे या फ्रेंड-सर्कलचे सदस्य... राहूल अन् अनिता यांची भेट हाच सुरुवातीला या फ्रेंड-सर्कलमधील गजबजलेला विषय

असायचा... त्यासाठी लेक्चर्स, काहीवेळा प्रॅक्टिकल्स बंक करण्याचेदेखील प्रमाण वाढत गेले. दररोज एकमेकांचे  डबे एकत्र बसून खाण्यात काय मजा असते, हे त्यावेळी कँटीनमध्ये या सगळ्यांना पाहणारे त्यांच्याच वर्गातले इतर मुले-मुली त्यांचा खूप हेवा करीत असतील. त्यांच्या गप्पा रंगायच्या, त्या तास-दोन तास सहज चालायच्या... त्यांची रोजची हीच दिनचर्या, कँटीन, पार्किंग, आणि केलं तर एखाद-दोन लेक्चर्स वा प्रॅक्टिकल... तीसरे सेमीस्टर असेच मजेत निघून गेले... परिक्षा तशा अपेक्षेप्रमाणे कधी जातच नसतात, पण नेहमीप्रमाणे मुलींनीच (आणि यांच्या ग्रुपमध्ये देखील अपवाद नव्हता!) टॉपच्या जागा मिळवल्या... आनंदाची गोष्ट म्हणजे सुमेधा क्लास-टॉपर आली होती त्यावेळी... सर्वांनी तीच्याकडून तशी जबरदस्त पार्टी देखील घेतली होती त्यासाठीची... राहूल, हर्षद, अजय, अनिता, सुमेधा ही सुखवस्तू कुटूंबांतील एकुलती-एक मुलं... त्यांच्याकडे स्वतःच्या गाड्या तशा होत्याच, शिवाय राहूलकडे घरी दोन लक्झुरी कार्सशिवाय टोयोटोची इनोव्हो देखील होती. वडीलांचा स्वतःचा व्यवसाय असल्याकारणाने त्याला पैश्यांची तशी कधीच गरज भासत नसे, पण तो इतर "रईसजादोंकी औलाद"प्रमाणे कधीच आपली श्रीमंती मिरवीत नसे वा त्याला त्या गोष्टींचा गर्व देखील नव्हता. हं, फक्त त्याच्याकडे महागडी बाइक, ब्रँडेड कंपन्यांची साधने, कपडे इत्यादी गोष्टी असायचा, पण त्यामुळे कोणाला त्याचा हेवा वाटेल, असं त्याचं वर्तन कधीच नसे. अंकित, राजश्री, निशा ही सुद्धा तशी मिडल-क्लास कुटूंबांतील मुलं, त्यांनाही पैश्यांची म्हणावी तशी चिंता नसायची, फक्त त्यांच्याजवळ स्वतःच्या गाड्या नव्हत्या, एवढाच काय तो फरक...! परिक्षा झाल्या, आता कुठेतरी बाहेर ट्रिप करुन जावं, असं बहुदा प्रत्येकाच्याच मनात होतं... सुमेधाच्या पार्टीच्या वेळी अनितानेच विषय काढला. सर्वांनी होकार दिला, हिवाळा असल्याने मस्त हिल-स्टेशन वगैरेकडे जाण्याचा मुलांच्या बाजुने सुर निघाला. पण मुलींना आधीच ट्रिपसाठी घरच्यांकडून परवानगी मिळण्याचे चान्सेस नव्हतेच, आणि जरी परवानगी मिळाली तर ती फक्त मुलीच ट्रिपला जाणार आहेत, असं सांगूनच मिळणार होती आणि त्यासाठी दिवसभरात हिंडून परत येता येईल, असे ठिकाण त्यांना हवे होते. शहरापासून अंदाजे ७०किमी लांब असलेलं एक लोकप्रिय हिल-स्टेशन ठरलं... पर्वतरांगेमधला एक उंचच-उंच डोंगर, उंचावरून वाहणारा धबधबा, चोहोबाजूंचा निसर्गरम्य परिसर, दाट हिरवळ व अनेक इत्यादी एकापेक्षा एक मनोरम गोष्टी असलेलं हे हिल-स्टेशन सर्वांनी पक्कं केलं... लगेच दुसऱ्या दिवशी जायचं, हे देखील नक्की करण्यात आलं. राहूलची इनोव्हो करून जायची, हे निश्चित. त्याने घरी अगोदरसुद्धा ट्रिपसाठी गाडी मागितली होती, अन् त्याला मिळालीही होती, त्यामुळे यावेळीही गाडी मिळून जाईल, हे राहूलला माहित होतं. दुसऱ्या दिवसासाठी सर्वांनी प्लॅनिंग चालू केलं, खायला काय-काय आणायचं की बाहेरच कुठेतरी जेवायचं वगैरे वगैरे गोष्टींवर दुसरा दिवस उजाडेपर्यंत चर्चा चालूच होती.

दुसरा दिवस उजाडण्याअगोदरच पहाटेच्या काळोखात सर्वांच्या घरी वातावरण जरी नेहमीप्रमाणे शांत असलं तरी ही मित्रमंडळी स्वप्नांच्या निराळ्याचा दुनियेत धुमाकूळ घालण्यात व्यस्त होती. जरी आधीच ठरलेलं असलं तरी निव्वळ औपचारिकता म्हणून आणि तयारीमध्ये कसलीही कसर राहू नये यादृष्टीने सकाळी ७ च्या सुमारास राहूलने सर्वांना ठराविक जागेवर ज्याने-त्याने थांबावं, अशी सुचना देणारा संदेश मोबाइलवरुन सर्व ग्रुप-मेंबर्सना पाठवला. राहूलच्या गाडीवर असणारा ड्रायव्हर त्याच्या अगदी जवळचा नि जिव्हाळ्याचा, तो त्यांना काका असे आदरात्मकरीत्या संबोधायचा. ड्रायव्हरला राहूलने अगोदरच त्याच्या फ्रेंड-सर्कल मधील मित्रांची माहिती दिलेली होती. सर्व तयारी आटोपल्यावर वेळेचा व्यवस्थित अंदाज घेत राहूलने घरुन गाडी सुमेधाच्या घराच्या दिशेने वळवली... पुर्वनियोजीत वेळेनुसार सुमेधा तिच्या घरापासून जरा लांब अंतरावर ठराविक ठिकाणी थांबलेली होती. तीला तेथून गाडीत बसवून नंतर अजय, हर्षद, राजश्री, अनिता, अंकित, कावेरी, निशा या सर्वांना वेळेवर पोहोचून गाडीत घेतले. सर्वजण अगदी खूष व आनंदाने अतिशय भारावलेले होते. निशाकडे गाडी सर्वात शेवटी पोहोचली, तसं ते ठरलेलंच होतं... कारण तीने दोन भले-मोठाले डबे भरुन खाण्याचे पदार्थ घेतले होते, ती पहाटेपासूनच ते बनवण्यात व्यस्त होती तशी... गाडी जशी शहराच्या बाहेर जाणाऱ्या चौपदरी हायवेला लागली, तसा ड्रायव्हरने ताशी वेग वाढवला, सुमारे ताशी ५०-६० मैल असा असावा. सकाळची वेळ असल्याने रस्त्यावरील रहदारी दिवसा असणाऱ्या प्रचंड गर्दीच्या तुलनेने अतिशय विरळ असल्याने गाडी अधिक जलद गतीने हाकण्यास कसलीच अडचण नव्हती, शिवाय रस्ताही अतिशय गुळगुळीत व सरळ होता. मुली तर असा पहिल्यांदाच प्रवास करीत होत्या नि एवढ्या जलद जाणाऱ्या प्रवासाची बहुतेकींना सवय देखी नव्हती, किंचीत घाबरल्याच होत्या काहीजणी... राहूलने त्यांच्या मनावरील द्विधा भाव लागोलाग हेरुन ड्रायव्हरला गाडीचा वेग कमी करण्यास सांगितले. आज यांच्यावर हवामान मेहेरबान दिसत होते, कारण सकाळचे साडे-आठ वाजूनदेखील सुर्याचा पत्ताच नव्हता, जरी दिवस थंडीचे असले तरी हिवाळ्यात देखील ऊन्हाचा भयंकर कहर आता लोकांना सहन करावाच लागत होता, परिणामी गरमीमुळे होणारी दगदग इत्यादी गोष्टी आल्याच... गाडी निश्चित ठिकाणाकडे जाणारी वाट पादाक्रांत करीत होती, तसे आतमध्ये बसलेल्या या मित्र-मैत्रिणींच्या गप्पांना, गलबलाटाला, किंकाळ्यांना उधाण वाढत गेले... सर्वांना ते हिलस्टेशन कधी एकदाचे येते याची उत्सुकता लागलेली होती. तासाभरात गाडी तेथे पोहोचली...

वाऱ्याचे झाडांच्या पानांशी चाललेले हितगूज आणि पक्ष्यांची मधूर किलबिल वगळता संपूर्ण परिसरात नीरव शांतता पसरलेली होती. त्या डोंगराच्या लगतच्या रस्त्यावरुन आपसुकच एखादं वाहन फिरकत होतं, त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यात असल्याचा हर्ष प्रत्येकालाच होत होता.

सकाळचे फक्त दहा वाजले असल्याकारणाने अजुनपर्यंत तरी तेथे फिरण्यासाठी कोणीच आलेले नव्हते, सहसा तेथे दूपारच्या नंतरच लोकांचं येणं चालू होतं. डोंगर चढण्याकरीता फार कठिण म्हणता येईल असा नव्हता पण तेवढा सोपादेखील मुळीच नव्हता. कित्येक ठिकाणी डोंगर चढतांना भल्या-भल्यांच्या नाकी नऊ येतील, असे अडथळे वाटेत बनलेले होते. एकूणच ही ट्रिप एक मस्त ट्रेक होणार, या भावनेनेच अनेकांचे चेहरे खुलले होते, मात्र अनिताने जेव्हा डोंगराकडे पाहिले तेव्हा तीच्या तोंडून चक्क 'बाप्पऽऽरे' असे आश्चर्योद्गार नकळत बाहेर पडले. तीने यापूर्वी कधीच अशा रांगड्या डोंगरांची चढाई केली नव्हती, त्यामुळे साहजिकच ती प्रथम घाबरलीच... सर्वांनी समजूत घातल्यावर तशी ती लगेच तयार देखील झाली. जेमतेच व गरजेपुरतेच सामान म्हणजे डबे, पाण्याच्या बॉटल्स इत्यादी काही बॅग्ज मध्ये भरून त्या मुलांकडे सुपूर्द करण्यात आल्या. गाडी व्यवस्थित पार्क करुन ड्रायव्हरने ते सर्वजण फिरून येईपर्यंत मस्त झोप काढण्याचा निर्णय घेतला. डोंगर चढण्यास साधारणतः पाऊण तास लागत असे, पण आता मुली सोबत असल्यामुळे हे वेळापत्रक बदलू शकणार होते. अंकित धावतच डोंगर चढण्यासाठी असलेल्या पाऊलवाटेकडे गेला, त्याला ट्रेकिंगची फार आवड... पण सर्वांनी सोबतच रहावं हा राहूलचा हट्ट होता, अखेर राहूलने समजावल्यावर अंकितला त्याची आगेकूच मोहिम आवरती घ्यावी लागली.

सर्व मुली आता पुढे चढत होत्या, व मुले त्यांच्या मागोमाग... पण अंकित फार आग्रही, तो अजुनही सर्वांच्या पुढेच होता, हं मुलींना वेळोवेळी चढतांना तो त्यांची मदत देखील करत होता तसा... सलग पंधरा मिनिटांपासून ते सर्वजण डोंगर चढीत होते आणि अचानक... अनिता एका ठिकाणी तोल जाऊन जागीच खाली पडली. राहूल धावतच तीच्यापाशी पोहोचला व त्याने त्याच्याच जवळ असलेल्या बॅगमधून प्रथमोपचार किट उघडून त्यातून निर्जूंतीकरणासाठी असलेली कुपी आणि बँडेज पट्ट्या काढल्या. बाजूलाच असणाऱ्या चुनखडीच्या ओबडधाबड खडकावर घसरुन पडल्यामुळे तीचा उजवा तळहात थोडाफार खरचटला होता... जखम फार काही मोठी नव्हती, पण राहूलने ती जखम व्यवस्थित साफ करुन तेथे बँडेज पट्टी बांधली. भाग्याचीच गोष्ट, डोंगराच्या पायथ्याशी असतांनाच ही घटना घडली, अन् त्यात अनिताला जास्त इजादेखील झाली नाही. अनिताला त्रास जरी होत असला तरी ती अद्याप विव्हळत नव्हती. सर्वांनी तीला खाली जाऊन आराम करण्याचे सांगितले, पण तीने ते ऐकले नाही, त्यांच्यासोबतच डोंगर चढण्याचा तीने निर्णय पक्का केला. आता मात्र राहूल तीच्या समवेत होता, तीचा हात घट्ट धरुन तो तीच्यासोबत डोंगर चढत होता. सगळेजण अखेर डोंगरावर पोहोचले, अद्याप राहूल, अनिता व हर्षद चढतच होते. हर्षदने राहूलला त्याच्याशी त्याला काहीतरी वैयक्तिक बोलायचे आहे असं कसलातरी संकेत देऊन थांबण्यास सांगितलं... डोंगराची चढाई संपली तशी अनिता तेथे आधीच पोहोचलेल्या मित्र-मैत्रिणींकडे जाण्यास निघाली. अनिता जाती आहे, हे पाहून तेथेच, थोडं खाली, राहूल व हर्षद थांबले.